# नागरी सहकारी पतसंस्थांना थकबाकी वसुलीचे आव्हान



महाराष्ट्र राज्यातील नागरी सहकारी पतसंस्थांना **थकबाकी** वसुलीचे आव्हान दिवसेंदिवस मोठे स्वरूप धारण करीत आहे. एन. पी. ए. ची तरतुद १०० टक्के केल्यानंतर व इतर सर्व आवश्यक तरतुदी पुर्ण केल्यानंतर राहिलेला निव्वळ नफा सभासदांपुढे जाहीर करता करता पतसंस्थांना मोठी जबाबदारी पार पाडावी लागते आणि यासाठी थकबाकीवर पुर्णपणे नियंत्रण किंबहुना थकबाकी मोठ्या प्रमाणावर कमी करणे हेच महत्वाचे काम पतसंस्थांपूढे आहे. यापुर्वी केलेला कर्ज पुरवठा व यापुढे करावयाचा कर्ज पुरवठा यामध्ये व्यवहारीक भुमिका स्विकारण्याची जबाबदारी संचालक मंडळ व पतसंस्थांचे अधिकारी यांच्यावर येते. ठेवीदारांच्या ठेवीच्या रकमांचे संवर्धन करण्याची जबाबदारी कायद्याने संचालक मंडळावर सोपविलेली आहे. यासाठी पतसंस्थांनी अशा प्रकारे कर्ज वाटावे की ज्याची थकबाकी होणारच नाही. परंतु ह्यापुर्वी वाटलेल्या कर्जाची जर थकबाकी झाली असेल तर वसुलीसाठी कायद्याच्या चौकटीतच पावले उचलली जाणे आवश्यक आहे. ज्या वित्तीय संस्थांना व बँकांना बँकींग लायसन्स प्राप्त झाले आहे, त्यांच्या ठेवीदारांना रूपये एक लाखापर्यंत भारत सरकारचे कायदेशीर संरक्षण आहे. परंतु पतसंस्थांच्या बाबतीमध्ये अशी भुमिका केंद्र सरकार व राज्य सरकारने ह्यापुर्वी नाकारलेली आहे. म्हणून अशा परिस्थितीत थकबाकीवर जर नियंत्रण ठेवले नाही तर पतसंस्थांमधील ठेवी कमी होऊन पतसंस्थेची संपुर्ण आर्थिक जडण घडण अडचणीत येते. यासाठी आता पतसंस्थांनीच स्वसंरक्षणार्थ व आपले प्रश्न आपणच सोडविण्यासाठी एकत्र येण्याची आवश्यकता आहे.

पतसंस्थांनी एकत्र येणे म्हणजे सभा, प्रशिक्षण, मेळावे, सत्कार नव्हे. तर यासाठी पतसंस्थांमधील थकबाकी वसुल करणेसाठी व पुन्हा भविष्यात थकबाकी होऊ नये यासाठी बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., मुंबई ने **www.mahasahakar.com** ही वेबसाईट थकबाकीवर उपाय म्हणून तयार केली आहे. **www.mahasahakar.com** या वेबसाईटमध्ये सरकार व सहकार आयुक्तांनी काढलेले जी. आर., विविध प्रकारचे आदेश, परिपत्रके अद्यावत उपलब्ध करुन ठेवलेले आहे. ज्यामध्ये प्रामुख्याने खालील महत्वाचे २० प्रमुख मुद्दे येतात.

१. सेवकां संदर्भात सूचना (एकूण परिपत्रके ५) दिनांक १५/०३/२०१२ पर्यंत
२. पतसंस्थांसाठी सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना (एकूण परिपत्रके ९) दिनांक ७/०५/२०१२ पर्यंत
३. पतसंस्था नोंदणी, कार्यक्षेत्र वाढ, नवीन शाखा (एकूण परिपत्रके १४) दिनांक २३/०६/२०११ पर्यंत
४. लाभांश (एकूण परिपत्रके २) दिनांक १८/०१०/२०००पर्यंत
५. लेखापरिक्षण (एकूण परिपत्रके १०) दिनांक ११/०४/२०११ पर्यंत
६. उपविधी (एकूण परिपत्रके ९) दिनांक १७/१०/२००८ पर्यंत
७. गुंतवणुक (एकूण परिपत्रके ४) दिनांक १३/०५/२०११ पर्यंत
८. कर्जवसुली (कलम १०१ व कलम १५६), एस. आर. ओ. (सामोपचार परतफेड योजना अपसेट प्राईजसह) (एकूण परिपत्रके २२) दिनांक १९/०६/२०१२ पर्यंत
९. एम्. आय्. एस्. (एकूण परिपत्रके ३) दिनांक २४/०२/२००३ पर्यंत
१०. डिपॉझीट गॅरंटी कार्पोरेशन (एकूण परिपत्रक १) दिनांक १२/०६/२००३ पर्यंत
११. एन्. पी. ए. (एकूण परिपत्रके ७) दिनांक ०५/०२/२०११ पर्यंत
१२. ठेवी व कर्जे (एकूण परिपत्रके १६) दिनांक २९/०८/२००९ पर्यंत
१३. अडचणीतील पतसंस्था (एकूण परिपत्रके १०) दिनांक १३/०८/२००९ पर्यंत
१४. चौकशी (कलम ८३ व ८८ अन्वये) (एकूण परिपत्रक १) दिनांक ०३/११/२००८ पर्यंत
१५. पतसंस्थांचे सर्वेक्षण (एकूण परिपत्रक १) दिनांक ११/०८/२००८ पर्यंत
१६. संचालक मंडळ निवडणुकीसाठी ठेव रक्कम (एकूण परिपत्रक १) दिनांक ०१/०९/२००७ पर्यंत
१७. मागासवर्गीयांसाठी आरक्षण (एकूण परिपत्रके २) दिनांक २६/१०/२००७ पर्यंत
१८. पतसंस्थांच्या विविध मागण्या (एकूण परिपत्रक १) दिनांक १८/०५/२००२ पर्यंत
१९. सर्वसाधारण परिपत्रके (एकूण परिपत्रके ५) दिनांक २३/०७/२००९ पर्यंत
२०. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम सुधारणा (एकूण परिपत्रक १) दिनांक १०/०८/२०११ पर्यंत

त्याचप्रमाणे **www.mahasahakar.com** या वेबसाईटमध्ये बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या सभासदांसाठी व **www.mahasahakar.com** या वेबसाईटच्या सभासदत्वासाठी अर्ज, फेडरेशनची आतापर्यंतची सर्व प्रकाशने, सहकार खात्यांच्या अधिकाऱ्यांचे पत्ते व दुरध्वनी क्रमांक उपलब्ध आहेत. त्याशिवाय **पतसंस्था परिवार या मासिकातील सन २००० पासून ते अद्यावत प्रत्येक महिन्याचे सर्व संपादकीय अग्रलेख** व होणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमाबद्दल माहिती उपलब्ध आहे. तसेच ह्या वेबसाईटमध्ये बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या संदर्भातील व एकंदरीत सहकाराची पार्श्वभुमी व विस्तार यासंदर्भात विस्तृत माहिती उपलब्ध करून ठेवलेली आहे. ही सर्व माहिती अद्यावत असते. **सहकाराचे गीत** सहकारातील अनेकांना माहित नसल्याचे दृष्टीक्षेपात आल्यामुळे या वेबसाईटमध्ये सहकाराच्या गीताचा सुध्दा अंतर्भाव केलेला आहे. संचालक मंडळ सदस्यांचे नावासहित फोटो उपलब्ध करून दिलेले आहेत. अशा उपयुक्त माहितीने **www.mahasahakar.com** वेबसाईट व फेडरेशनच्या संपर्कासाठी सुध्दा माहिती आपल्या सर्वांसाठी अद्यावत करून ठेवलेली जाते.

सर्वात महत्वाचे म्हणजे **www.mahasahakar.com** या वेबसाईटमध्ये सहकाराच्या आंदोलनाचे प्रणेते व आधारस्तंभ आहेत, ते **स्व.डॉ. धनंजयराव गाडगीळ, स्व.वैकुंठभाई मेहता, स्व.यशवंतराव चव्हाण, स्व.वसंतदादा पाटील, स्व.डॉ. विखे - पाटील** यांचे फोटोद्वारे सर्वांनी स्मरण करावे यासाठी याचीसुध्दा उपलब्धतता या वेबसाईटमध्ये केलेली आहे. पतसंस्थांच्या थकबाकीवर जालीम औषध म्हणुन जे काम सरकारने करणे आवश्यक होते ते काम या **www.mahasahakar.com** वेबसाईटच्या माध्यमातून बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., मुंबई ने केलेले आहे. सर्व पतसंस्थांनी आपल्या ह्या फेडरेशनचे सभासद होऊन फेडरेशनच्या **www.mahasahakar.com** या वेबसाईटचे सभासद होणे आवश्यक आहे. आणि एकदा वेबसाईटचे सभासद झाल्यानंतर पतसंस्थांकडील **महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९१ व कलम १०१ अन्वये मिळालेले सर्व अवॉर्डस तसेच निगोशिएबल ईन्स्ट्रूमेंट ॲक्ट १८८१ चे कलम १३८ अन्वये मिळालेल्या आदेशाची प्रत** फेडरेशनला सादर

करणे आवश्यक आहे. उदाहरणादाखल मुंबईतील २००० च्या दरम्यान असणाऱ्या नागरी सहकारी पतसंस्थांनी उपरोक्त अवॉर्डस ह्या वेबसाईटमध्ये अंतभुर्त करण्यासाठी उपलब्ध करुन दिले तर चमत्कार झाल्याशिवाय राहणार नाही. **प्रत्येक पतसंस्थेला एक लॉगीन आय. डी. व पासवर्ड आम्ही देणार आहोत.** त्यामुळे कोणीही सभासद कर्ज मागणीस आला तर त्या कर्जदाराचा कुठल्याही इतर पतसंस्थेतील वरिल प्रमाणे थकबाकीचा संपुर्ण इतिहास माहित पडणार आहे. त्यामुळे कुठलीही थकबाकीदार व्यक्ती पहिल्या संस्थेतील थकबाकी त्या पतसंस्थेत भरल्याशिवाय नवीन कर्जास पात्र ठरू शकत नाही. आणि हे सुत्र व भुमिका सर्वत्र ज्ञात झाली तर सर्व - सामान्य कार्यकर्त्यांनी उभ्या केलेल्या नागरी सहकारी पतसंस्था **सराईत थकबाकीदारांच्या मगरमिठ्ठीतून बाहेर पडतील. व पतसंस्थांना वैभवाचे सोनेरी दिवस येतील**. त्याचा परिणाम बँकांप्रमाणे पतसंस्थांच्या ठेवींनासुध्दा सरकारला संरक्षण द्यावेच लागेल अशी परिस्थिती तयार होईल. **पतसंस्थांनी हा चमत्कार दाखवुन नमस्कार स्विकारण्यास सज्ज होणे आवश्यक आहे.** यासाठी **www.mahasahakar.com** ह्या वेबसाईटचे सर्व नागरी सहकारी पतसंस्थांनी सभासद व्हावे असे पुनश्चः आवाहन या अग्रलेखाद्वारे करीत आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार!!!**